म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ग्रा-वा
दा. क्र. ३००६
BVBK-0403006

म. सं. सं. अत्रे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. क्र. ३००६ दिनांक १०।८।९८
विषय बा. वा.

३००६
१०।८।९८

# हसा !
# मुलांनो हसा !!

[ १५१ विनोद ]

: संकलक :

श्री. सुनील अंबिके

BVBK-0403006

श्री समर्थ साई वितरण, पुणे.

• **प्रकाशक** / श्री. सुनील अंबिके
**श्री समर्थ साई वितरण**
१५६, मंगळवार पेठ, पुणे ११.

• **सर्वहक्क प्रकाशकाधीन.**

• **प्रथमावृत्ती** / डिसेंबर, १९९३

• **मुखपृष्ठ** / अक्षय ॲडव्हर्टायझिंग सर्व्हिस, पुणे.

• **मुद्रक** / सौ. मेघा अंबिके
**अंबा मुद्रण,**
८९८, मंगळवार पेठ, पुणे ११.

• **मूल्य** / **रुपये अठरा फक्त**

# हसा ! मुलांनो हसा !

## १. खुलासा

एका शिंप्याच्या दुकानात तावातावाने शिरलेले संपतराव त्याला म्हणाले, "हा पाहा सूट ! त्या चौकातल्या टेलरनं शिवलाय. एवढंच नाही तर त्यानं उरलेल्या कापडातून आपल्या चार वर्षांच्या मुलासाठी चड्डीसुद्धा शिवलीन् ... अन् तुम्ही तर म्हणत होता की, एवढा कपडा पुरणार नाही म्हणून."

"त्यानं शिवला असेल साहेब. त्याचा मुलगा चार वर्षांचा आहे, पण माझा अकरा वर्षांचा आहे. तेव्हा..." शिंपी म्हणाला.

❖

## २. गैरसमज

एन. सी. सी.तल्या विद्यार्थ्यांची चांगलीच रपेट घेतल्यावर काहीजण कुरकुरू लागले. त्यांची कुरकुर ऐकून कमांडरने खडसावले -

"एवढ्यात थकलात ? अशा लहानशा रपेटीनं थकायला लागलात तर देशाची सेवा काय करणार आहात ? थकलो म्हणून सांगायला शरम वाटली पाहिजे तुम्हांला..."

विद्यार्थ्यांनी कोणताच प्रतिसाद दिला नाही हे पाहून कमांडरने त्यांना आव्हान दिले -

"इथून अजून तीन किलोमीटर रपेट करावयाची आहे. ज्यांची हिंमत नसेल त्यांनी दोन पावलं मागे व्हावं..."

महेश सोडून बाकीचे सगळे जवान मागे हटले.

महेश दृढतेने उभा असलेला पाहून कमांडरने त्याची पाठ थोपटली, "शाब्बास ! अशी हिंमत पाहिजे. चल आपण पुढे जाऊ."

"त्याचं असं आहे सर... मी एवढा थकलोय की माझ्यात दोन

पावलं मागं व्हायचंही त्राण नाही म्हणून मी मागे हटलो नाही.'' महेश मुळीच हालचाल न करता म्हणाला.

❖

## ३. अंत:प्रेरणा

दादू षटकांमागून षटकं टाकत राहिला, पण विकेट काही मिळेना. तेव्हा त्याला थोडा वेळ आराम दिला गेला. काही वेळानं कॅप्टननं पुन्हा त्याच्या हातात चेंडू दिला. पहिल्याच चेंडूवर फलंदाजाने सणसणीत चौकार मारला. दादू दुसरा बॉल टाकण्याच्या तयारीत असताना कुशल संघनायक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, '' अरे, समोर यष्टी नसून गणिताचं पुस्तकच उभं आहे, असं समज अन् चेंडू टाक.''

आणि काय आश्चर्य ! दुसऱ्याच चेंडूवर त्रिफळा उडाला !!!

❖

## ४. खोटारडी

फ्लॉवरपॉटचे तुकडे झालेले पाहून माधवराव रागाने म्हणाले, '' कुणी फोडलं हे ? ''

'' दादानं फोडलाय् हा फ्लॉवरपॉट.'' पल्लवीनं पटकन सांगितलं.

'' खोटं बोलतेय ही.'' रागावून दादा म्हणाला.

'' नाही पप्पा. मी स्वत: पाहिलं यानंच फोडलं.''

'' हॅट ! मी हा फ्लॉवरपॉट फोडला तेव्हा ही तर बाहेर खेळत होती. खोटारडी कुठली ! '' दादा म्हणाला.

❖

## ५. घरीसुध्दा तेच ?

एके दिवशी शंभूला शाळेत पोहचायला खूपच उशीर झाला. शिक्षकांनी त्याची कानउघाडणी करून विचारलं, '' इतका उशीर कशामुळं झाला ? ''

'' झोपेतून उठायला वेळ झाला सर.''

'' म्हणजे ? '' गुरुजींनी आश्चर्य व्यक्त केलं, '' घरीसुद्धा तू झोपाच काढतोस वाटतं ?''

❖

## ६. आळशी कोण ?

"तुमच्या वर्गात सर्वात आळशी कोण आहे रे ?" शाळा तपासण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी सहज एका विद्यार्थ्याला विचारलं.

"ते कसं सांगता येईल ?" त्या विद्यार्थ्याने बुचकळ्यात पडून विचारलं.

"हे बघ, मी तुला एक युक्ती सांगतो. वर्गात सर्वजण गणित सोडवण्यात किंवा इतर काही अभ्यास करण्यात गर्क असतात. तेव्हा कोण स्वस्थ बसलेलं असतं ?" अधिकाऱ्याने विचारले.

"गुरुजी." तो विद्यार्थी ताडकन उद्‌गारला.

❖

## ७. परिभाषा

पत्रकार : तुमच्या पक्षातला एखादा माणूस दुसऱ्या पक्षात सामील झाला तर तुम्ही काय म्हणाल ?

राजकारणी : फितुरी.

पत्रकार : आणि याच्या उलट घडलं असेल तर ?

राजकारणी : हृदयपरिवर्तन !

❖

## ८. पूर्वज्ञान

ऑफिसच्या कामानिमित्त गोव्याला निघालेल्या माधवरावांनी सोबत पत्नीला न्यायचं ठरवलं. अशोक व अंजू या आपल्या अपत्यांना मात्र त्यांनी घरीच ठेवायचा निश्चय केला. आपल्या मुलांना समजावीत ते म्हणाले, "आता तुम्ही मोठे झालात तेव्हा तुमच्यावर घर सांभाळण्याची जबाबदारी टाकायला हरकत नाही... माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे. तुम्ही शहाणपणाने वागाल याचीही मला खात्री आहे... काम तसं तीनच दिवसांचं आहे पण एखाद्या वेळेस कदाचित आठ दिवसही लागतील. असं काही झालं तर मी ताबडतोब पत्र पाठवीनच..."

"त्याची काहीच गरज नाही बाबा... मला आधीच ते पत्र तुमच्या टेबलावर सापडलंय्." अशोक त्यांना थांबवीत म्हणाला.

❖

## ९. लॉटरी!

"काय रे, लॉटरी तिकीट घेण्यापूर्वी तू नेहमी मिठाई का खातोस गणू?"

"साखरेचे खाणार त्याला देव देणार या म्हणीची सत्यता पाहण्यासाठी." इति धोंडू.

❖

## १०. कारण

सुट्टीचा मौसम होता. बाळू दररोज दुपारी हटकून खेळायला जाई. एके दिवशी आई त्याला म्हणाली, "अरे बाळू, उन्हात फार हिंडू नकोस, ताप येईल." तेव्हा बाळू म्हणाला, "आई, सरांनीच आम्हांला सांगितलं आहे की सूर्यप्रकाशात हिंडल्यास 'डी' जीवनसत्व तयार होतं म्हणून!"

❖

## ११. ओळख

शहरी जीवनाला कंटाळलेले बाबूराव काही दिवसांसाठी चेंज म्हणून एका निसर्गरम्य खेड्यात जाऊन राहिले. जवळचे पैसे संपल्यावर त्यांनी पैसे पाठवण्यासाठी घरी पत्र लिहिलं. काही दिवसांनी त्यांच्या नावाची मनीऑर्डर आली. सूचना मिळताच ते पैसे घेण्यासाठी पोस्ट ऑफिसात गेले. पोस्टमास्तरांनी त्यांना विचारलं, "बाबूराव का तुम्ही?"

बाबूरावांनी होकारार्थी मान हलवली.

"पण तुम्हीच बाबूराव आहात हे कशावरून? मी तर तुम्हांला ओळखत नाही." पोस्टमास्तर म्हणाले. बाबूरावांनी स्मित केलं अन् खिशातून आपला फोटो काढून पोस्टमास्तरांना दाखवित म्हणाले, "बोला, आहे का नाही माझा फोटो?"

पोस्टमास्तरांनी फोटो न्याहाळून पाहिला अन् मनीऑर्डरचे पैसे देत म्हणाले, "बरोबर, तुम्हीच ते!"

❖

## १२. खऱ्यांची दुनिया?

पती : आजकाल खऱ्याची दुनियाच राहिली नाही सगळेच खोटारडे!

पत्नी : का? काय झालं?

पती : आज सकाळी पेपरवाल्या पोराने मला एक रुपयाचे खोटे नाणे दिले.

पत्नी : पाहू कुठे आहे ते ?

पती : ते मी सार्वजनिक फोनमध्ये टाकून साहेबांना फोन केला आणि सांगितले की, आज माझ्याकडे पाहुणे आल्यामुळे मी ऑफिसला येणार नाही!

❖

## १३. शाळेची आवड

सदू नुकताच शाळेत जाऊ लागला होता. एके दिवशी शाळेतून तो घरी आल्यावर बाबांनी त्याला विचारले, "काय रे सदू, कशी आवडते शाळा तुला ?"

"बंद असलेली." सदूने उत्तर दिले.

❖

## १४. कशाला उगीच ?

सुट्टीत पर्यटनासाठी अमित आईबाबांबरोबर गोव्याला गेला होता. काही प्रेक्षणीय स्थळं पाहून झाल्यावर सर्वजण हॉटेलात जेवायला गेले. वेटरनं जेवणाची ताटे आणून ठेवली. अमित जेवायला सुरुवात करणार तोच आईनं फर्मावलं, "अमित, आधी प्रार्थना म्हणायची."

"पण आई, आपण तर या जेवणाचे पैसे देणार आहोत." अमित बुचकळ्यात पडून म्हणाला.

❖

## १५. दुसरी चूक

राजाने आपलं मनगटी घड्याळ दुरुस्तीवाल्याकडे नेलं. त्याच्या हातात घड्याळ देत तो म्हणाला, "काल चूकच झाली माझ्या हातनं. किल्ली देताना हे खाली पडलं अन्..."

"तू दुसरी चूक केलीस ती पडलेल्या घड्याळाला उचलण्याची." दुरुस्तीवाल्यानं ऐकवलं.

❖

## १६. मूर्खानंद

वर्गात नव्याने आलेल्या एका चुणचुणीत मुलाला चिडवण्यासाठी

राजू त्याला म्हणाला -

"का रे? काय नाव आहे तुझं?"

"मूर्खानंद." तो उत्तरला.

"वा! काय सुंदर नाव आहे तुझं.

"खरंच! तुला खूपच आवडलं?"

"हो."

"मग तूच ठेवून घे नाव. मी दुसरं कोणतंतरी ठेवून घेईन." तो म्हणाला.

❖

## १७. छे! छे!!

शिक्षिका : पृथ्वी गोल आहे हे तू कसं सिद्ध करून दाखवशील, बोल?

माला : पण मॅडम मी तसं कधी म्हटलंच नाही.

❖

## १८. डासांचे दिवे

शामू व रामू आपल्या वर्गाबरोबर सहलीला गेले होते. त्यांची सहल एका धरणाला गेली होती. धरणाच्या भोवती मोठे रान होते. रात्री मुले धरणापाशी असलेल्या एका बंगल्यात झोपली; पण तेथे अतोनात डास होते. डासांचा त्रास टाळण्यासाठी शामूने रामूला डोक्यावरून चादर घेऊन झोपायला सांगितले. दोघांनी मग डोक्यांवरून चादरी लपेटून घेतल्या.

रामूला अशी झोपायची सवय नसल्यामुळे चादरीच्या आत त्याला थोडेसे गुदमरल्यासारखे वाटले, म्हणून त्याने तोंडावरची चादर दूर केली. खोलीतल्या अंधारात कित्येक काजवे चमकत होते.

"शामू," रामू म्हणाला, "हे पाहयलंस का?"

"काय रे, रामू?" शामूने विचारले.

"अरे, आपण डोक्यावरून चादरी घेऊन झोपलो. पण हे डास आपल्याला शोधण्यासाठी आता दिवे घेऊन आले आहेत."

❖

## १९. आईचे मानसशास्त्र

शांताबाई प्रथमच आपल्या छोटया मुलाला घेऊन शाळेत गेल्या.

त्यांनी शिक्षिकेची भेट घेऊन आपल्या मुलाशी कसं वागावं आणि कसं वागू नये याची चक्क यादीच करून दिली. शेवटी त्या म्हणाल्या, "माझा मुलगा फार नाजूक आहे. त्याचं मन फारच हळवं आहे. त्याला जर तुम्हाला शिक्षा करावयाची असेल तर अगदी सौम्य शिक्षा करा. त्याने फारच मोठी खोडी केली तर त्याच्या जवळच्या मुलाला तुम्ही चपराक मारली तरी माझ्या मुलावर योग्य तो परिणाम होईल."

❖

## २०. कारण

सगळा वर्ग सहलीसाठी जायला तयार झाला पण रश्मीनं मात्र सहलीला जायचं टाळलं. मैत्रिणीनं तिला विचारलं, "का ग, का येत नाहीएस तू सहलीला?"

"तेथून परतल्यावर सर सहलीवर निबंध लिहायला सांगतील म्हणून." रश्मीनं कारण सांगितलं.

❖

## २१. नक्कीच

हलणाऱ्या दाताच्या दुखण्याने बेजार झालेल्या रामला लक्ष्मण म्हणाला, "हा दात माझा असता तर केव्हाच उपटून टाकला असता."

"हूं: हा दात तुझा असता तर मी सुद्धा तो उपटून काढायला मागंपुढं पाहिलं नसतं." रामने ऐकवलं.

❖

## २२. अनुभवसिध्द

"ते घर? छ्या! घर आहे का ते? शुद्ध गोठा आहे गोठा!" रामराव आपल्या मित्राला सांगत होते, "ते घर तू भाड्यानं घेऊ नये असं मला प्रामाणिकपणे वाटतं बघ. अरे त्यात फक्त जनावरंच राहू शकतील."

"पण तुला कसं माहीत?" मित्रानं विचारलं.

"चार वर्षे काढलीत त्या घरात मी!" रामरावांनी खुलासा केला.

❖

## २३. अजबच!

छोटा अनुपम आई-बाबांशी गप्पा मारीत होता. अचानकच त्याने बाबांना विचारलं, "तुमचा जन्म कुठं झाला पप्पा?"

"नागपूरला बेटा."

"अन् आईचा?"

"ती मुंबईला जन्मली."

"मी?"

"तुझा जन्म इथे पुण्यातच एका इस्पितळात झाला."

"मग आपण सगळे एकत्र आलो तरी कसे?" अनुपमने अतीव आश्चर्याने विचारले.

❖

## २४. आधीच सांगितलं

छोटूचं नाव शाळेत दाखल करण्यासाठी माधवराव त्याला घेऊन शाळेत गेले. बाईंनी छोटूला दोन-चार प्रश्न विचारले. छोटूनं लगेच त्यांची उत्तरं दिली. बाईंना हा चुणचुणीत मुलगा खूपच आवडला. शेवटी बाईंनी छोटूला विचारलं, "तुला लिहिता वाचता येतं का?"

"लिहिता येतं. पण वाचता येत नाही." छोटू म्हणाला.

बाईंना आश्चर्य वाटलं. त्या म्हणाल्या, "असं? तुझी पाटी घे अन् त्यावर तुझं नाव लिहून दाखव.

छोटूनं पाटी घेतली अन् मोठ्ठ्या अक्षरात त्यावर काहीतरी लिहिलं. ते लिखाण पाहून बाई काहीशा आश्चर्याने म्हणाल्या,

"काय लिहून ठेवलंस हे? तूच वाचून दाखव पाहू?"

"पण बाई, मी आधीच सांगितलं होतं की, मला वाचता येत नाही म्हणून..."

छोटू शांतपणे म्हणाला.

❖

## २५. गुपित

नव्याने निघालेल्या ओरिएंट टेलिव्हिजन कंपनीचा फिरता विक्रेता कंपनीच्या प्रचारार्थ वेगवेगळ्या योजना घेऊन फिरत होता. एके दिवशी

तो वत्सलाबाईंकडे आला. एक योजना त्यांच्यापुढे मांडत तो म्हणाला, "आमच्या कंपनीनं बनविलेला टेलिव्हिजन अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा असून तो परदेशी टेलिव्हिजनपेक्षा काकणभर सरसच ठरेल, शिवाय तो तुलनेने स्वस्तही आहे. हा टेलिव्हिजन सगळ्यांना सहज उपलब्ध व्हावा म्हणून आमची एक योजना अशी आहे. सुरुवातीला तुम्ही फक्त तीनशे रुपये भरायचे, नंतर चार महिन्यांपर्यंत एकही पैसा द्यायचा नाही."

"आमच्याबद्दल हे असं तुम्हाला कुणी सांगितलं?"

विक्रेत्याला मध्येच थांबवून वत्सलाबाई काहीशा नाराजीने म्हणाल्या.

❖

## २६. *(आं)घोळ*

नव्याने ओळख झालेल्या एका मित्राने शंभूला उन्हाळ्याच्या सुट्टीत मुंबईला येण्याचं निमंत्रण दिलं.

ठरल्याप्रमाणे शंभू मुंबईला पोहचला. मित्राचा प्रचंड फ्लॅट, तिथलं मौल्यवान फर्निचर, बहुमूल्य अशा शोभेच्या वस्तू पाहून शंभूचे डोळे दिपले. त्याचे वडील खूप श्रीमंत असले तरी त्याच्या घरी असलं काही नव्हतं. आपण या गोष्टी पाहून मुळीच प्रभावित झालो नाही असं त्यानं दाखवायला सुरुवात गेली. आणि त्यानं कोल्हापुरातील आपल्या प्रचंड वाड्याचंही वर्णन केलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी आंघोळीची वेळ झाली तेव्हा मित्र म्हणाला, "चल, आंघोळ उरकून घे तू. आत शॉवर-बाथ आहे. शॉवर-बाथनं आंघोळ करायला खूप मजा येते."

शंभू आत गेला.

पाऊण तास झाला तरी शंभू काही बाहेर येईना तेव्हा मित्रानं दरवाजा ठोठावला, तेवढ्यात शंभू आंघोळ उरकून बाहेर पडला.

"एवढा वेळ काय करीत होतास रे?" मित्राने विचारले.

"काय करू, तुमचा शॉवर-बाथ चांगला आहे. पण बादली भरायला खूपच वेळ लागतो बुवा." शंभू म्हणाला!

❖

## २७. शिष्टाचार

एका तळ्याकाठी एक इसम निवांतपणे फिशिंगसाठी बसला होता. काही वेळाने एक लहान मुलगा आणि त्याची आई तिथे आली. आल्या आल्या मुलगा त्या इसमाला म्हणाला, ''ओ ऽ बाबा, तुम्ही मासा पकडा ना. मला बघायचाय मासा.''

''या मुलानं 'कृपा करून मासा पकडा' असं म्हटल्याखेरीज तुम्ही मुळीच मासा पकडू नका हो.'' आई म्हणाली.

❖

## २८. जागा मिळेल!

''आज वर्तमानपत्रात माझ्या राशीत जागेचा प्रश्न सुटेल असे लिहिले होते.''

''बरं मग?''

''ऑफिसला येता येता लोकलमध्ये बसायला जागा मिळाली.''

❖

## २९. छोटी सभा

''बाबा'', वसंता वडिलांना म्हणाला, ''उद्या सकाळी शिक्षक-पालक संघाची एक छोटी सभा आयोजित करण्यात आली आहे.''

''छोटी सभा म्हणजे?'' बाबांनी चिरंजिवांना विचारले.

''फक्त तुम्ही, मी आणि हेडमास्तर.''

❖

## ३०. आभार!

एकदा एक माणूस जंगलात गेला. समोर एक खवळलेला सिंह आला. आता आपली खैर नाही, असे पाहून माणसाने गुडघे टेकून प्रार्थनेला सुरुवात केली. ते पाहून सिंहही गुडघे टेकून बसला.

माणूस खूश झाला, ''धन्यवाद सिंहा, क्षणापूर्वी मी तुला घाबरलो होतो.''

''शू ऽऽ मध्ये बोलू नकोस.'' सिंह म्हणाला, ''देवाने तुला पाठविल्याबद्दल मी त्याचे आभार मानतो एवढेच!''

❖

## ३१. मोठ्ठी थाप

चाळीच्या आवारात चाळीतली मुले एका कुत्र्याच्या पिल्लाभोवती जमली होती. एवढ्यात गोपाळराव जिना उतरून तेथे आले.

"काय रे मुलांनो," गोपाळरावांनी विचारले, "काय चाललं आहे?"

"अहो, काका" एक जण म्हणाला, "थापांची चढाओढ चालली आहे आमची. जो कोणी सर्वात मोठ्ठी थाप मारील, त्याने हे कुत्र्याचं पिल्लू घ्यायचं असं आमच्यात ठरलं आहे."

"अरे मुलांनो," गोपाळराव म्हणाले, "तुमच्या वयात आम्ही कधी थापा मारत नव्हतो."

"'काका, तुम्ही जिंकलात," सर्व मुले ओरडली, "हे कुत्र्याचं पिल्लू तुम्हीच घेऊन जा."

❖

## ३२. तापच

श्वेताचा वाढदिवस होता. श्वेताच्या आईनं पार्टीला आपल्या मैत्रिणींना बोलावलं होतं. पार्टीला येताना कुलकर्णीबाईंनी सोबत भेट म्हणून एक खेळणं आणलं होतं. सगळ्यांबरोबर त्यांनी ते श्वेताच्या सुपूर्द केलं. पार्टी संपल्यावर त्या परतू लागल्या तेव्हा श्वेता धावत येऊन त्यांना म्हणाली, "आण्टी, तुम्ही दिलेल्या खेळण्याबद्दल थँक्यू बरं का."

"अग, त्यात काय एवढं? अगदी सामान्य खेळणं तर आहे ते." कुलकर्णीबाई हसून म्हणाल्या.

"माझंही तेच मत आहे आण्टी, पण आईनं सांगितलंय् की अशा प्रसंगी धन्यवाद द्यावेच लागतात." श्वेता सहजपणे म्हणाली.

❖

## ३३. आळस

एका शाळेचे विद्यार्थी श्रमदान करण्यासाठी म्हणून एका खेड्यात जाऊन पोहचले. रस्त्यावर मुरुम टाकण्याचं काम त्यांनी हाती घेतलं. जोशीसर निरीक्षण करीत होते. त्यांनी अशोकला विचारले,

"बाकीचे विद्यार्थी टोपलं गच्च भरून मुरूम नेत आहेत अन् तू

मात्र फक्त अर्धच नेतो आहेस."

"ते आळशी आहेत. दोन चकरा करायला घाबरतात." अशोक म्हणाला.

❖

## ३४. वेग

बसमधून उतरताना एक लठ्ठ बाई कंडक्टरला म्हणाली, "कंडक्टर तुमची बस फार सावकाश धावते हो!"

कंडक्टर म्हणाला, "बाई तुम्ही उतरलात की ती जलद धावू लागेल."

❖

## ३५. मासे पकडले

बाबूराव गळ घेऊन नदीवर मासे पकडण्यासाठी गेले होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांच्या गळाला एकही मासा लागला नाही. शेवटी बाबूराव तसेच हात हालवीत घरी निघाले. वाटेत ते मच्छीबाजारात गेले व तेथे एका मासे विकणाऱ्यास म्हणाले, "हे बघ, दोन बांगडा माशांचे पैसे मी तुला देतो. पण तू एक कर. मी जरा लांब उभा राहतो, तू हे मासे येथून फेक म्हणजे मी ते झेलून घेईन." "अहो, हे काय भलतंच?" तो मासे विकणारा म्हणाला, "मी मासे फेकायचे, तुम्ही झेलायचे - ही काय भानगड आहे?"

"सकाळपासून नदीत गळ टाकून बसलो होतो, पण एकसुद्धा मासा मिळाला नाही," बाबूरावांनी खुलासा केला, "आता नुसता हात हालवीत घरी गेलो, तर बायकोला काय वाटेल? पण आपण तिच्याशी कधी खोटं बोलत नाही. मासे 'पकडले' हे तिला सांगायला हवं ना?"

❖

## ३६. परिचय

वर्तमानपत्राचे वाचन करीत बसलेल्या केशवरावांचे लक्ष आपल्याकडे वळवीत त्यांचे चिरंजीव म्हणाले, "बाबा, बाबा, आज आपले नवे शेजारी माझ्याशी बोलले."

"अच्छा! काय म्हणाले ते?" केशवरावांनी उत्सुकतेनं विचारलं.

"पुन्हा इकडे आलास तर तंगडी मोडीन." चिरंजीवांनी सांगितलं.

❖

## ३७. घाबरू नको

मुंबईला पोहचल्याबरोबर बाबूरावांनी सुखरूप पोहचल्याची तार पाठविली. तार पाठवून ते पोस्टाच्या बाहेर पडत होते तोच त्यांच्या मनात विचार आला की, तारेचं नाव ऐकताच पत्नी घाबरून जाईल. तेव्हा ती घाबरू नये म्हणून ते लगेच पोस्टात गेले आणि त्यांनी दुसरी तार पाठविली.

'पोहचल्याची तार पाठविली आहे घाबरू नकोस.'

❖

## ३८. पत्र

छोटा मधू एका कागदावर रेघोट्या-ओढीत बसलेला पाहून आईनं कौतुकानं विचारलं, "काय करतोयस बाळ?"

"बाळूला पत्र लिहितोय्." मधू म्हणाला.

"अरे, पण तुला लिहिता थोडंच येतंय!" आई आश्चर्याने म्हणाली.

"त्याला तरी वाचता कुठं येतंय?" मधू आणखी वेगानं रेघोट्या ओढत म्हणाला.

❖

## ३९. मार उडी!

एके दिवशी राजू बंटीला घेऊन बाजाराला निघाला होता. वाटेत नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी खोदून ठेवलेला खड्डा लागला. राजूने एका झेपेत खड्डा पार केला. पण बंटी मात्र घाबरला. त्याची काही उडी मारायची हिंमतच होईना. राजूने बंटीला प्रोत्साहन दिलं, "अरे, एवढासा तर खड्डा आहे. मार उडी."

"नको बाबा, एवढी मोठ्ठी उडी नाही मारता यायची मला." बंटी घाबरलेल्या आवाजात म्हणाला.

"मग असं कर, दोन उड्यांत पार कर हा खड्डा." राजूने सल्ला दिला.

❖

## ४०. अनुभव

बस कंडक्टरच्या जागेसाठी आलेल्या उमेदवाराला विभागीय अधिकाऱ्यानं विचारलं, "या कामासाठी आवश्यक असा अनुभव तुम्हाला आहे काय?

"होय साहेब."

"कोणता, म्हणजे यापूर्वी तुम्ही कुठं काम करीत होता?"

"मी आतापर्यंत लिफ्टमन म्हणून एका कंपनीत काम करीत होतो साहेब." उमेदवार म्हणाला.

❖

## ४१. हायवे

एका इसमाच्या टकलावर बसलेल्या दोन माश्यांतला वाद.

बाळ माशी : आई, किती मोठी अन् छान सडक आहे नाही?

आई माशी : हो, मी लहान असताना इथे एक लहानशी पायवाट होती बघ.

❖

## ४२. विनातिकीट

"तिकीट?"

"नाही."

"कुठे जायचे आहे?"

"जिथे 'रामाचा' जन्म झाला तिथं."

"पण तुमच्याजवळ तर तिकीट नाही; तेव्हा जिथं 'कृष्णाचा' जन्म झाला तिथं चला."

❖

## ४३. जागृती

"ज्याने मानव जागा झाला असा शोध कोणता म्हणता येईल?" शिक्षकांनी विचारले.

"गजराचे घड्याळ." बाळूने उत्तर दिले.

❖

## ४४. भेट

कर्नल हरबंस साहेबांच्या वाढदिवशी रामभाऊंनी शुभेच्छेसह त्यांना एका सुंदरसा पक्षी भेट दिला. बोलणारा हा पक्षी रामभाऊंनी खास हरबंस साहेबांसाठी पाचशे रुपये खर्चून आणला होता.

चार दिवसांनंतर एका पार्टीत त्यांची भेट झाली तेव्हा विश करून झाल्यावर रामभाऊंनी त्याला विचारले,

"हं कशी काय वाटली आमची भेट ?"

"व्वा ! फारच स्वादिष्ट !" कर्नल साहेब मिशीवरून बोट फिरवीत म्हणाले.

❖

## ४५. तिसरा बुडाला

तीन माणसे होडीत बसून समुद्रावर सहलीला निघाली होती. होडी किनाऱ्यापासून समुद्रात थोडीशी आत गेली असेल तोच पहिला माणूस म्हणाला, "अरे, मी माझा फराळाचा डबा आणायला विसरलो, तो घेऊन येतो." एवढे म्हणून तो होडीतून उतरला आणि सरळ पाण्यावरून चालत किनाऱ्याकडे निघाला. तेवढ्यात दुसरा माणूस म्हणाला, "अरे, मी पण माझा मासे पकडायचा गळ आणायला विसरलो, तो घेऊन येतो." म्हणून तोसुद्धा पहिल्या माणसाप्रमाणे पाण्यावरून चालत गेला.

होडी थोडी पुढे गेल्यावर तिसऱ्या माणसास वाटले, या दोघांचा रुबाब कशाला हवा आहे ? आपणही त्यांच्यासारखी करामत करून दाखवू. "मी पण पिण्याच्या पाण्याची पिशवी विसरलो आहे." असे म्हणून तो होडीतून समुद्रात उतरला व तेथल्या तेथे पाण्यात बुडून मेला.

किनाऱ्याकडे निघालेल्या दोन माणसांनी हे बघितले, तेव्हा पहिला दुसऱ्यास म्हणाला, "अरे, पाण्यात खडक कुठे आहेत ते आपण त्याला सांगायला हवं होतं."

❖

## ४६. गुपीत

"मी गाढव आहे असं तू सर्वांना सांगत सुटला आहेस. याचा अर्थ काय ?"

"माफ कर हं. ही गोष्ट लपवून ठेवायची हे मला माहीत नव्हतं."

❖

## ४७. लष्करी परंपरा

सेवानिवृत्त झालेले एक मेजरसाहेब खेड्यात राहवयास आले. त्यांना एक चांगला घोडा विकत घ्यावयाचा होता. एका माणसाने त्यांना आपला घोडा दाखविला. घोड्याबद्दल माहिती देताना तो म्हणाला, "हा घोडा मोठा उमदा आणि लष्करी परंपरेत वाढलेला आहे."

दुसऱ्याच दिवशी मेजरसाहेब त्या माणसाकडे घोडा परत घेऊन आले अन् संतापाने म्हणाले, "लबाड माणसा, मला फसवतोस काय? म्हणे घोडा लष्करी परंपरेत वाढलेला आहे. हा तर पळायचं नावच घेत नाही."

"मी मुळीच खोटं सांगितलं नाही मेजरसाहेब." तो माणूस म्हणाला, "घोडा एक वेळ मरेल पण मुळीच पळणार नाही."

❖

## ४८. विचारायचं कुणाला?

दादू पहिल्यांदाच, एकट्याने प्रवास करीत होता. आधीच कल्पना दिलेली असल्याने स्टेशनवर त्याचे मामा त्याला घ्यायला आले होते. मामाला पाहताच तो आनंदला. मामांनी मोठ्या प्रेमाने त्याला विचारले, "कसा काय झाला प्रवास? त्रास तर झाला नाही ना काही?"

"खूपच त्रास झाला." दादू सुस्कारा टाकून म्हणाला.

"ट्रेनमध्ये मला वरचा बर्थ मिळाला आणि पोट बिघडलेले असल्याने वारंवार खाली उतरावं लागत होतं."

"खालच्या बर्थवाल्याला सांगून बर्थ बदलून घ्यायचा होता मग." मामा म्हणाले.

"मीही तोच विचार केला पण खालचा बर्थ रिकामाच होता, मग विचारायचं कुणाला?" दादू म्हणाला.

❖

## ४९. किती सोपं!

बाबांनी आपलं मनगटी घड्याळ कानाला लावून पाहिलं. बंद पडलं

होतं ते. त्यांनी हाक मारून दादूला सांगितलं, "जरा टॉवरपर्यंत जा बघू. किती वाजलेत ते पाहून ये."

"पण माझ्याजवळ घड्याळ नाही ना."

"तर काय ? अरे किती वाजले ते एका कागदावर लिहून आण." बाबा म्हणाले.

❖

## १०. थोडा दम धरा

आपल्या नोकरावर भयंकर संतापलेले केशवराव मोठ्याने ओरडले, "तुला काय वाटतं मी एवढा मूर्ख आहे... गाढव आहे ? "

"ते मी आताच कसं सांगू साहेब ? मला इथं येऊन पुरता आठवडाही झाला नाही." नोकर हळूच पुटपुटला.

❖

## ११. अभ्यास

फोनवरील बोलणं संपल्यावर बंटी आपल्या पित्याकडे वळून म्हणाला, "पप्पा, जेव्हा माझं होमवर्क लिहिणं तुम्ही संपवाल तेव्हा शेजारच्या माधुरीच्या वडिलांकडे वही पाठवून द्या. त्यांनी मागितली आहे."

❖

## १२. भाडं

उन्हाळ्याच्या सुट्टीत निसर्गरम्य ठिकाणांना भेट देण्यासाठी सुनील व त्याचे चार मित्र निघाले. पहिला मुक्काम त्यांनी एका खेडेवजा गावात केला. मुक्कामासाठी ठिकाणाचा शोध घेताना त्या गावातल्या एकुलत्या एक धर्मशाळेत ते येऊन पोहचले. तिथल्या व्यवस्थापकांनी धर्मशाळेच्या खोल्या त्यांना दाखवल्या. त्या खोल्या पाहून सुनील नाक मुरडत म्हणाला, "यांना खोल्या म्हणायचं म्हणजे अजबच आहे ! हा तर शुद्ध गोठा आहे, गोठा. पण नाईलाज आहे आमचा. पर्याय नसल्यामुळे मुक्काम तर इथंच करावा लागणार ... बरं काय भाडं आहे याचं ?..."

"एका बैलाला दोन रुपये." व्यवस्थापकाने शांतपणे सांगितले.

❖

## ९३. पर्याय

एक म्हातारा गाईड पर्यटकांना एक प्राचीन राजमहाल दाखवीत होता. एकेका भागाचं वर्णन करीत तो राजमहालातील शयनगृहात आला आणि म्हणाला, "याच ठिकाणी दोनशे वर्षांपूर्वी काही देशद्रोह्यांनी राजाचा वध केला होता." सगळे पर्यटक ही कहाणी ऐकून स्तब्ध झाले. त्यातलाच एक कहाणी सांगून झाल्यावर म्हणाला, "पण मागच्या वेळी तर तुम्ही ही घटना वेगळ्याच दालनात घडल्याचं सांगितलं होतं."

"मला माहीत आहे, पण आपण काही दिवसांसाठी त्या दालनात जाऊ शकत नाही, तिथे दुरुस्ती चालू आहे." गाईड शांतपणे म्हणाला.

❖

## ९४. कुतुबमिनार

पहिला वेडा : काल मी स्वप्नात कुतुबमिनारला धक्के देत होतो, पण तो जराही हलला नाही.
दुसरा वेडा : कसा हलणार, मी त्याला घट्ट पकडून ठेवले होते ना ?

❖

## ९५. दिवाळी ते दसरा

"बाबा," बाळूने विचारले. "मुंबईहून पुण्यास आगगाडीने जाण्यास किती वेळ लागतो हो ?"

"चार तास." बाबांनी सांगितले.

"आणि पुण्याहून मुंबईस येण्यास किती वेळ लागतो ?" बाळूने पुन्हा विचारले.

"एवढी साधी गोष्ट तुझ्या कशी लक्षात येत नाही रे ?" बाबा थोडेसे चिडून म्हणाले, "चारच तास."

"असं सगळं नेहमीच काही सारखं नसतं, बाबा !" बाळू शांतपणे म्हणाला, "दसरा ते दिवाळी २० दिवस. पण दिवाळी ते दसरा मात्र ३४० दिवस !"

❖

## ९६. हा कोन कितीचा ?

शिक्षक : तर मुलांनो, यातला लेखकाचा दृष्टिकोण आपण समजून

घेतला पाहिजे –

बाळू : (तंद्रीतून जागा होऊन) सर, दृष्टिकोण हा साठ अंशाचा कोन का नव्वद ?

❖

## १७. यह नजदिकीयाँ !

भारतातून अमेरिकेत शिकण्यासाठी गेलेले तीन विद्यार्थी एका इमारतीच्या ३५ व्या माळ्यावर शेजारी शेजारी राहत होते. दर रविवारची संध्याकाळ ते एकत्र घालवत. एके रविवारी हेमू म्हणाला, ''प्रत्येक रविवारी शीतपेये पिऊन मला कंटाळा आलाय. आज आपण भारतीय पद्धतीचा मस्त चहा पिऊ.'' चंदूने आणि रवीने ही कल्पना उचलून धरली.

पण चहा करायला स्वयंपाक खोलीत हेमू गेला तर दूध नव्हते. लागलीच रवी दूध आणायला लिफ्टमधून खाली जायला निघाला. परंतु रवी तळमजल्यावर पोहोचण्यापूर्वीच घरात साखर नव्हती हे हेमूच्या लक्षात आले.

तसा तो व चंदू गॅलरीत जाऊन उभे राहिले. रवी रस्त्यावर येताच त्यांनी जोरजोराने टाळ्या पिटून रवीचे लक्ष वेधून घेतले. रवीने हातानेच विचारले, 'काय ?' तसं हेमू व चंदू तार स्वरात सांगते झाले. ''साखरही आण.'' पण त्यांचे शब्द रवीच्या कानावर पडण्यापूर्वीच हवेत विरून जात. शेवटी घसा कोरडा झाल्यावर चंदू घरात गेला आणि दुर्बिण घेऊन तो पुन्हा गॅलरीत आला. दुर्बिण डोळ्याला लावून तो हलक्या आवाजात रवीला म्हणाला, ''रवी, घरात साखर नाही तेव्हा तीही घेऊन ये.''

❖

## १८. परीक्षण

संदीप नव्या बंगल्यात राहायला गेला. फारच छान बंगला होता. मस्तपैकी रंग, समोर लहानशी बाग... बागेला छोटेसे फाटक. या नव्या बंगल्यात संदीपच्या वडिलांनी एक अल्सेशियन कुत्राही नुकताच आणला होता.

एके दिवशी संदीपला भेटायला आलेला एक मित्र कुत्र्याला पाहून फाटकातच थबकला. त्याला थांबलेला पाहून गॅलरीत उभा असलेला

संदीप ओरडला, "अरे, ये ना! घाबरतोस कशाला?"

"पण, हा चावत तर नाही ना?" मित्राने काहीशा भीतीयुक्त स्वरात विचारले.

"तेच तर पाहायचंय् ... कालच आणलाय्." संदीप कुत्र्याकडे प्रेमाने पाहत म्हणाला.

❖

## ५९. सराव

बबनराव बंदूक चालवायला शिकले अन् त्यांनी शिकार करायची ठरवलं. शिकारीसाठी ते जंगलात तळ ठोकून बसले. एके दिवशी सकाळीच आपला तंबू सोडून ते शिकार शोधायला निघाले. लवकरच त्यांना एका वाघोबाचे दर्शन झाले. लगेच त्यांनी बंदूक उचलली अन् कसाबसा नेम धरून गोळी झाडली. पण गोळी वाघाला न लागता त्याच्या पलीकडे पंचवीस फुटांवर असलेल्या झाडावर जाऊन आदळली. त्यांनी दुसरी गोळी झाडण्याचा प्रयत्न केला पण त्याआधीच वाघानं त्यांच्यावर झेप घेतली पण त्याची झेप चुकली अन् तो बबनरावांच्या पलीकडे पंधरा फुटांवर जाऊन आदळला. बबनरावांनी संधी साधून तळाकडे धूम ठोकली.

दुसऱ्या दिवशी त्यांनी जवळच्या लक्ष्यावर गोळ्या झाडण्याचा सराव सुरू केला. त्यांचा सराव चालू असताना जवळच्या झाडीतून कसलासा आवाज आला. आवाजाचा वेध घेतल्यावर त्यांना कालचाच वाघ दिसला. हे वाघोबा अगदी तन्मयतेने जवळच्याच अंतरावर उडी मारण्याचा सराव करीत होते!

❖

## ६०. उपयोग नाही

एका लहान मुलानं बाबूरावांकडे भीक मागितली तेव्हा त्याला आपादमस्तक न्याहाळीत बाबूरावांनी विचारलं, "तुझं नाव काय बाळ?"

"पांडू, काही मदत करा ना साहेब."

"तुझं वय काय असेल रे?"

"असंल सात-आठ वर्ष."

"या वयात तर तू शाळेत जायला हवं होतं बाळ."

का हो ?"

"हो ना, चांगल्या चार खिडक्या आहेत."

"मग त्या उघडून टाका."

"व्वा! छान! म्हणजे माझी कबुतरं उडून जाऊ दे वाटतं." तो मनुष्य म्हणाला.

❖

## ८४. पूर्वज्ञान

डॉक्टर शहाणे शेजारच्या बाळ्याला चांगल्या गोष्टी शिकविण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनी विचारलं, "बाळ, आपण काय केलं म्हणजे आपल्याला स्वर्गाची प्राप्ती होईल ?"

"आपण मरायला हवं," बाळ्या म्हणाला.

"अगदी बरोबर." डॉक्टर म्हणाले, "पण मरण्यापूर्वी काय केलं पाहिजे ?"

"तुम्हाला बोलवायला हवं." बाळ्या चटकन म्हणाला.

❖

## ८५. नुकसानभरपाई

दंत चिकित्सकाने दात उपटून काढल्यावर दत्तोपंतांनी कण्हत-कण्हत विचारले, "तुमची फी किती झाली डॉक्टरसाहेब ?"

"चाळीस रुपये." डॉक्टर म्हणाले.

"पण इथे पाटीवर एका दाताचे दहाच रुपये लिहिलेले आहेत ना ?" दत्तोपंतांनी आश्चर्याने विचारले.

"हो. एका दाताचे दहाच रुपये होतात पण दात काढताना तुम्ही केलेली आरडाओरड ऐकून माझे तीन पेशंट पळाले त्याचं काय ?" डॉक्टरांनी प्रतिप्रश्न केला.

❖

## ८६. कृपया...

स्वत:ला विद्वान आणि अभ्यासू समजणाऱ्या व्यक्तीच्या खोलीवर एक फलक लावलेला होता.

'कृपया गोंगाट करू नका.'

त्या खालीच कुणीतरी खडूनं लिहिलं होतं - 'नाहीतर आमची झोप मोडेल.'

❖

## ८७. मी कोण?

'निसर्गाचे मानव जातीवर उपकार' या विषयावरचं व्याख्यान ऐकल्यापासून बबलीनं निसर्गावर प्रेम करायचं ठरवलं. वेगवेगळ्या वृक्षांची-वनस्पतींची माहिती तिनं मिळवायला सुरुवात केली. एवढंच नव्हे तर तिनं बाबांजवळ हट्ट करून उन्हाळ्याच्या सुट्टीत ताडोबा राष्ट्रीय उद्यानाला भेट देण्यासाठी त्यांचं मन वळवलं.

ठरल्याप्रमाणे सुट्टीत ती बाबांबरोबर ताडोबाला येऊन ठेपली. दिवस निघाला की ती गेस्ट-हाऊसच्या बाहेर पडून भोवतालच्या परिसरातील वृक्षांची पाहणी करायची. या वृक्षांशी बोलण्याचा एक नवाच छंदही तिला जडला!

एके पहाटे ती एका वृक्षासमोर उभी राहून म्हणाली, "हे गुलमोहर, तू मला खूपच आवडतोस... तुला बोलता आलं असतं तर तू काय म्हणाला असतास?"

जवळच तिचे बाबा उभे होते. ते हसून म्हणाले, "बहुतेक हा म्हणाला असता की - बाळ, मी गुलमोहर नसून सागवान आहे."

❖

## ८८. निदान

"रात्री जॅकी चेनचा चित्रपट पाहून झोपलो तर एक फारच वाईट स्वप्न पडलं मला," राजू आपल्या मित्राशी बोलताना म्हणाला.

"कसलं स्वप्न?"

"जॅकी चेन व आमच्या शेजारच्या बंडूत जोरदार फायटिंग होत असल्याचं दिसलं मला स्वप्नात."

"यात वाईट काय?"

"अरे यार, या मारामारीत बंडूची चक्क सरशी होत होती." राजू म्हणाला.

❖

## ८९. बिचारा

नुकत्याच लग्न झालेल्या बहिणीने लोकरीचा एक भारी कोट परिधान केला तेव्हा तिचा छोटा भाऊ बारकाईने कोटाचं निरीक्षण करीत म्हणाला, ''ताई, तुला हा कोट घालायला मिळावा म्हणून त्या प्राण्याला किती त्रास सहन करावा लागला असेल नाही?''

''तुझ्या मेव्हण्याविषयी असं काही बोलू नकोस हं,'' ताई काहीशी रागावून म्हणाली.

❖

## ९०. आता तरी

''आई, मी खेळायला बाहेर जाऊ का गं? रमेश माझी वाट पाहत असेल.'' बाळ्यानं विनवणी केली.

''त्याच्याबरोबर खेळलेलं मला मुळीच आवडत नाही हे ठाऊक नाही का तुला?'' आईनं दरडावलं.

''मग त्याला ठोकून काढायला जाऊ का?'' बाळ्यानं विचारलं.

❖

## ९१. सोपं आहे ते

मित्रांबरोबर राजेशनं हॉटेलात प्रवेश केला. सगळ्यांसाठी त्यानं आपल्या आवडत्या डोशाची ऑर्डर दिली. डोसा खाताना मध्येच त्यानं वेटरला बोलावून विचारलं, ''नवा कूक ठेवलाय् की काय?''

''होय साहेब. पण तुम्हांला कसं कळलं?'' वेटरनं उत्सुकतेनं विचारलं.

''डोशात काळा केस दिसतोय्. पूर्वी डोशात कधी-कधी पांढरा केस दिसायचा.'' राजेश म्हणाला.

❖

## ९२. अज्ञान

''कुलकर्ण्यांच्या गोटूला तू चापट मारलीस म्हणे?'' आईने किशोरला विचारले.

''तू गोटूला ओळखतेस का?'' किशोरने प्रश्न केला.

''नाही. पण त्याचा इथे काय संबंध?'' आई आश्चर्याने म्हणाली.

"त्याला ओळखत नाहीस म्हणून तू असं म्हणालीस, नाहीतर त्याला चांगलं बदडून काढायला हवं होतं; असं म्हणाली असतीस." किशोर म्हणाला.

❖

## ९३. न्याय

निष्काळजीपणे मोटार चालविण्याच्या गुन्ह्याखाली दोन न्यायमूर्तींना कोर्टात आणलं गेलं. त्यावेळी कोर्टात कुणी नसल्याने त्यांनी एकदुसऱ्याच्या गुन्ह्याबद्दल निकाल द्यायचं आपसांत ठरवलं.

पहिल्याने न्यायमूर्तींच्या खुर्चीवर बसून विचारलं, "तुम्हांला गुन्हा कबूल आहे काय ?"

दुसऱ्यानं मान्य केलं.

न्यायमूर्तींनी त्याला दहा रुपये दंड आणि पुन्हा असा निष्काळजीपणा न करण्याची ताकीद देऊन खटला संपवला.

आता दुसऱ्यानं न्यायासन सांभाळून विचारलं, "तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?"

"होय."

"अशा घटना दिवसेंदिवस वाढीला लागल्या आहेत. चिंताजनक बाब आहे ही. सकाळीही याच प्रकारची केस कोर्टात आली होती. या प्रकारांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करणं आवश्यक असल्यानं पन्नास रुपये दंड आणि एका आठवड्यासाठी लायसेन्स जप्त करण्याचा हुकूम न्यायालय देत आहे." दुसऱ्यानं निकाल दिला.

❖

## ९४. महापुरुष ... लघुपुरुष ...

एका प्रसिद्ध पर्यटन स्थळाला भेट द्यायला गेलेल्या राजाभाऊंनी पर्यटन केंद्राकडून एक गाईड मिळविला. गाईडने त्यांना त्या भागातील सगळी प्रेक्षणीय स्थळे दाखविली. चिकित्सक वृत्तीच्या राजाभाऊंनी गाईडला प्रश्न विचारून त्या भागाच्या संस्कृतीची, इतिहासाची ओळख करून घेतली. शेवटी त्यांनी विचारले, "या भागात एखाद्या मोठ्या माणसाने जन्म घेतला का ?"

"ना... नाही साहेब. आतापर्यंत तर इथं सगळी लहान मुलंच जन्माला आली आहेत." गाईड काहीसा गोंधळून म्हणाला.

❖

## १५. दिनांक

वर्तमानपत्र चाळत बसलेल्या हेमाला तिच्या आईनं विचारलं, "कोणती तारीख आहे गं आज ?"

"माहीत नाही." हेमा म्हणाली.

"वर्तमानपत्र आहे ना गं तुझ्या हातात ?"

"पण हे कालचं वर्तमानपत्र आहे." हेमा म्हणाली.

❖

## १६. जर ...

रोज तेच – तेच स्वप्न पाहून अस्वस्थ झालेल्या बंटीला डॉक्टरकडे नेण्यात आलं. त्यानं डॉक्टरांना सांगितलं. "डॉक्टर अंकल, दररोज मला एकच स्वप्न पडतं. स्वप्नात क्रिकेटचं मैदान दिसतं. आमची टीम क्षेत्ररक्षण करीत असते. आमचा जलद्गती गोलंदाज चेंडू फेकतो. फलंदाज तेवढ्यात जोराने फटका मारतो. चेंडू माझ्या दिशेने येतो. मी सज्ज असतोच तरीपण चेंडू माझ्या हाताजवळून निघून जातो. सगळेजण माझ्याकडे रागाने बघतात. गोलंदाज तर शिव्या द्यायला लागतो."

"या बाबतीत मी कोणती मदत करावी असं तुला वाटतं बाळ ?" डॉक्टरांनी विचारलं.

"चेंडू नेमका माझ्या हातात येईल असं काही करता आलं तर..." बंटी म्हणाला.

❖

## १७. पाप कुणाचे; ताप कुणाला ?

एकदा आचार्य अत्रे एका समारंभाला गेले असताना, तेथील लोकांनी त्यांच्याभोवती एकच गर्दी केली आणि "अत्रेसाहेब, आम्हाला तुमचा 'मराठा' आवडतो, पण त्यासाठी प्रसंगी दुप्पट किंमत मोजावी लागते," अशी तक्रार सुरू केली. त्यावर अत्रे म्हणाले, "काहो, तुम्ही आपापल्या घरी दूध घेता ना ? मग त्याचे भाव वाढले तर गवळ्याकडे तक्रार करता का म्हशीकडे ?" अत्र्यांचा हा प्रतिप्रश्न ऐकला आणि मग त्यांच्याभोवती

जमलेल्या साऱ्यांनी हसतच पण हळूच तेथून काढता पाय घेतला.

❖

## ९८. विश्रांतीची आवश्यकता

बरेच दिवस रजेवर असलेला एक सरकारी कर्मचारी डॉक्टरांकडे गेला आणि आपल्याला अतिशय थकल्यासारखे वाटतंय, अशी तक्रार करू लागला. डॉक्टरांनी त्याची तपासणी केली आणि गंभीर मुद्रा करून ते म्हणाले, 'मिस्टर, तुम्हाला विश्रांतीची अतिशय आवश्यकता आहे. शक्य तितक्या लवकर ऑफिसात जायला सुरुवात करा पाहू!'

❖

## ९९. आदेश वरिष्ठांचा

जुने 'रेकॉर्ड' ठेवण्यास जागा नसल्यामुळे ते नष्ट करण्याची परवानगी मिळावी, असा अर्ज एका खातेप्रमुखाने आपल्या वरिष्ठांकडे केला. तो वरिष्ठांनी मंजूर केला; पण 'जुने रेकॉर्ड नष्ट करताना त्यातील सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स कॉपीज मात्र काढून ठेवाव्यात' असा आदेशही दिला.

❖

## १००. मार्ग चुकला; बेत हुकला

सुरेंद्र : अरे सुधीर, तू या मांजराला दूर जंगलात सोडून द्यायला गेला होतास ना, मग आता त्याला पुढ्यात घालून कसा काय परतलास ?

सुधीर : अरे, त्याचं काय झालं, मी या मांजराला सोडायला जंगलात गेलो खरा, पण मग परतीचा मार्ग सापडेना तेव्हा मग त्यालाच माझा वाटाड्या केलं आणि आलो कसा-बसा परत त्याच्या मदतीनं...

❖

## १०१. 'मी कशाला बाटलीत राहिलो असतो ?'

बाटलीतल्या राक्षसाचे रहस्य माहीत असलेल्या अल्लाउद्दीनने एक दिवस बाटली घासून राक्षसाला आमंत्रित केले आणि आपल्यासाठी एक सहा खोल्यांचा झकास फ्लॅट तयार करण्याची आज्ञा त्याला दिली. त्यावर तो राक्षस म्हणाला, "महाराज, अहो तुम्ही वेडे का खुळे? असे फ्लॅट तयार करण्याची शक्ती माझ्याकडे असती, तर मी स्वतः कशाला बाटलीत राहिलो असतो ?" ❖

## १०२. सोपं आहे

काकांनी अंजूला एक गणित घातलं, "पन्नास माणसांसाठी वरण तयार करायला पाच किलो तुरीची डाळ लागते तर शंभर माणसांसाठी किती डाळ लागेल?"

"तेवढीच, फक्त पाण्याचं प्रमाण वाढवावं लागेल." अंजू पटकन म्हणाली.

❖

## १०३. मदत

किचनमधून येत असलेला आवाज ऐकून आई ओरडली, "सोनू, काय करतोयस तू तिथे?"

"मी पिंकीला मदत करतोय आई." सोनू तिथूनच ओरडून म्हणाला.

"अन् ती काय करतेय?"

"डब्यातून लाडू काढून खातेय," सोनू म्हणाला.

❖

## १०४. उशीर

एका प्रख्यात सर्जनची अपॉईटमेंट घ्यायला किमान पंधरा दिवस तरी नक्कीच लागायचे. पेशंट आल्यावर मात्र ते हमखास म्हणायचे,

"तुम्ही इथं यायला खूपच उशीर केलात."

❖

## १०५. त्याचं काय?

संजूला स्वत:साठी स्वेटर हवा होता. स्वेटर विकत घेण्यासाठी तो सोबत आपल्या लहान भावाला घेऊन गेला. बरेचसे स्वेटर पाहून झाल्यावर त्याने एक भडक रंगाचा स्वेटर पसंत केला. स्वेटर पाहून छोटा भाऊ म्हणाला, "हा नको, मला नाही आवडत असला रंग."

"अरे, पण मला आवडलाय ना?"

"तुला आवडला असेल, पण दोन वर्षांनी तो मलाच वापरावा लागेल त्याचं काय?" छोट्या भावाने खुलासा केला.

❖

## १०६. श्शू! हळू!!

एक शेतकरी शेतात काम करून घरी परत आला तेव्हा त्याच्या बायकोने 'कुदळ कुठे सोडून आलात' म्हणून विचारले. तो मोठ्याने ओरडून म्हणाला,

"शेतातच सोडून आलो."

बायको म्हणाली, "जरा हळू बोला. कोणी ऐकेल तर चोरून नेईल ना. आत्ताच जा अन् घेऊन या बरं." तो परत शेतावर गेला पण कुदळ त्याला कुठेच सापडली नाही. मग तो घाईघाईने घरी आला आणि बायकोच्या कानात पुटपुटला, "शेतात कुदळ नाही!"

❖

## १०७. अबोला

दिवाळीच्या सुट्टीत एके दिवशी माधुरीच्या नावानं एक पोस्टकार्ड आलं. पोस्टकार्ड चक्क कोरंच होतं. बाबांनी ते कार्ड तिच्या हातावर ठेवत विचारलं, "हे कार्ड तर कोरंच आहे. कुणी पाठवलं असावं?"

"हे नक्कीच श्वेतानं पाठविलेलं आहे." माधुरी आत्मविश्वासानं म्हणाली.

"पण हे असं कोरं?"

"सुट्टीत गावाकडं जाताना ती माझ्याशी जाम भांडली, अन् आजकाल आमचा अबोला चालू आहे." माधुरी म्हणाली.

❖

## १०८. भविष्य

वर्षभराचं राशीभविष्य सांगणारं एक पुस्तक बाबूरावांनी पंचवीस रुपयांना खरेदी केलं. लगेच त्यांनी त्या दिवसाचं भविष्य उत्सुकतेनं हुडकून काढलं. त्यात लिहिलं होतं-

'नको त्या गोष्टीवर मूर्खासारखा खर्च कराल.'

❖

## १०९. त्यासाठी

सुट्टीमध्ये माधव घराजवळच्याच लायब्ररीतून पुस्तकं आणून वाचायचा. आईला त्याचं खूप कौतुक वाटायचं. एके दिवशी तो अतिशय

तन्मयतेने पुस्तक वाचत असताना आई हळूच त्याच्याजवळ गेली. तो वाचत असलेलं पुस्तक पाहून मात्र तिला खूपच आश्चर्य वाटलं. पुस्तकाचं नाव होतं - 'मुलांचे पालन-पोषण.'

"हे पुस्तक का वाचतोयस् रे ?" आईनं हसून विचारलं.

"माझं पालन-पोषण योग्य प्रकारे होतंय का नाही ते पाहायचंय मला." माधव म्हणाला.

❖

## ११०. एक प्रश्न

धावत्या बसमधून केव्हा उतरावे ?

.... हॉस्पिटल जवळ असेल तेव्हा.

❖

## १११. घ्या

मानसोपचारतज्ज्ञाकडे गेलेल्या अजायबसिंगना डॉक्टरांनी विचारलं, "काय होतंय् तुम्हाला ?"

"डॉक्टर साहेब, लोक लक्षच देत नाहीत माझ्या बोलण्याकडे. मी काय करू ?"

"नेक्स्ट्." डॉक्टरसाहेब ओरडून म्हणाले.

❖

## ११२. तर्कशास्त्र

नौकाविहार करीत असताना बंडूनं बाबांना विचारलं, "पप्पा, एखादी वस्तू अमुक ठिकाणी आहे हे नक्की माहीत असताना ती हरवली असं म्हणता येईल काय ?"

"वेडाच आहेस ! असं कसं म्हणता येईल बरं ?" पपा म्हणाले.

"पप्पा, तुम्ही परवाच घेतलेलं घड्याळ तळ्यात पडलंय." बंडू म्हणाला.

❖

## ११३. वेडा कुठला !

"माझं पत्र आलंय् का एखादं ?" अजायबसिंगनी पोस्टमनला विचारलं.

"आपलं नाव काय?"

पोस्टमनने विचारलं.

"ते पत्रावर लिहिलेलं असेलच ना?" अजायबसिंग त्याच्या अज्ञानाची कीव करीत म्हणाला.

❖

## ११४. कमालच

"माझे पपा एवढ्या जोरात पळू शकतात की, त्यांनी धनुष्यातून सोडलेल्या बाणाच्यापुढे धावत जाऊ शकतात." नरेंद्र म्हणाला.

"हे तर काहीच नाही." पप्पू म्हणाला, "दोन किलोमीटरवरच्या हरणावर माझे बाबा नेम धरून गोळी झाडतात आणि गोळी हरणाला लागण्यापूर्वी हरणापर्यंत पोहचतात."

दादू म्हणाला, "माझे डॅडी तर कमालच करतात. ते एका फॅक्टरीत काम करतात. सकाळी साडे अकराला घरातून निघून ते अकरा वाजता तेथे पोहोचतात आणि फॅक्टरी सुटते सहाला पण ते घरी येतात साडेपाच वाजता."

❖

## ११५. आलो, आलो!

एकदा एका माणसाने एका श्रीमंत माणसाला पत्र लिहिले की, मला तुमचा बैल काही दिवसांकरिता उसना द्यावा. पत्र आले त्या वेळी तो श्रीमंत माणूस कोणाशी तरी बोलत होता. आपले अज्ञान पाहुण्याला दिसू नये म्हणून त्याने पत्र वाचल्याचे ढोंग केले व ते आणून देणाऱ्याला म्हटले, "ठीक आहे, मी आलोच म्हणून सांग."

❖

## ११६. शक्कल

जांबुवंतरावांनी आपल्या फटाक्यांच्या दुकानातून माल चोरीला जाऊ नये म्हणून एक पहारेकरी नेमला. तो सतत उभा राहून गिऱ्हाईकांवर देखरेख करी.

त्या पहारेकऱ्याला पाहून आश्चर्य व्यक्त करीत अरुणने जांबुवंतरावांना विचारलं, "काका, या कामावर तुम्ही तिरळा माणूस

का नेमलाय ?''

''तो नेमका कुणाकडे पाहतोय् हे सांगू शकशील का तू?'' जांबुवंतरावांनी उलट प्रश्न केला.

❖

## ११७. फिर मिलेंगे

अशोकनं एक खोकं पैदा केलं. एका बाजूचा पुठ्ठा काढून टाकला अन् एक बाजू टीव्हीच्या स्क्रीनसारखी कापली. हे नवं खेळणं आपल्या छोट्या भावाला दाखवीत तो म्हणाला, ''चल आपण टीव्हीचा खेळ खेळू या. तू घोषणा कर. मी गाणं म्हणतो.''

''नाही. तू घोषणा कर मी गाणं म्हणतो.''. छोट्यानं आग्रह केला.

''बऱ्या बोलानं घोषणा कर नाहीतर रट्टे देईन.'' अशोकनं धमकी दिली.

''दिल्ली दूरदर्शन से प्रसारित होनेवाले आज के कार्यक्रम समाप्त हो चुके है. कल प्रात: आपसे फिर भेंट होगी. नमस्कार!'' छोट्यानं घोषणा केली!!

❖

## ११८. कामगिरी!

लष्कराच्या एका तुकडीला युद्धाचे प्रात्यक्षिक दिले जात होते. एका गटाला सांगण्यात आले —

''तुम्ही रेल्वे स्टेशनवर हल्ला करायचा आहे व ते उपयोगात आणता येणार नाही अशी स्थिती निर्माण करायची आहे.''

काही वेळाने गटप्रमुखाला प्रश्न विचारण्यात आला, ''तुम्ही स्टेशन उडवून लावलं ना ?''

''नाही साहेब'' प्रमुख म्हणाला, ''पण स्टेशनचा उपयोग कुणीच करू शकणार नाही. आम्ही सगळी तिकिटं जप्त केली आहेत.''

❖

## ११९. उपाय

न्यू इंग्लिश स्कूलचा ड्रायव्हर वळणावरसुद्धा बसचा वेग कमी करायचा नाही. बंटीला खूपच भीती वाटायची. एके दिवशी तो ड्रायव्हरला म्हणाला. " ड्रायव्हर अंकल, तुम्ही वळणावरही बस भन्नाट वेगानं पळवता. जरा हळू चालवा ना. मला खूपच भीती वाटते."

" अरेरे, घाबरायचं काय त्यात ? मी करतो तसं तूही कर म्हणजे तुला भीती वाटणार नाही."

" काय करता तुम्ही ? "

" वळण आलं की मी माझे डोळे बंद करून घेतो." ड्रायव्हर म्हणाला.

❖

## १२०. सल्ला

" रात्री मला झोपेत भयंकर स्वप्नं पडतात. खूपच भीती वाटते मला." अनुप आपल्या मित्राला सांगत होता.

" अरे, असं स्वप्न पडलं की लगेच डोळे गच्च मिटून घेत जा म्हणजे तुला मुळीच भीती वाटणार नाही." मित्राने सल्ला दिला.

❖

## १२१. वेळच नव्हता !

रडणाऱ्या बाळूला जवळ घेत आईनं विचारलं, " काय झालं रे ? का रडतोयस् ? "

" खो खो खेळताना गुडघ्याला मार लागला." बाळू डोळे पुसत म्हणाला.

" पण खेळ संपून तर बराच वेळ झाला."

" हो. खेळताना रडायला वेळच मिळाला नाही." बाळू म्हणाला.

❖

## १२२. डोकं

दादूच्या डोक्याला भलंमोठं बँडेज बांधलेलं पाहून मित्राने विचारले,

" काय रे, काय झालं तुझ्या डोक्याला ? "

" माझ्या बाबांमुळे झालं हे."

"म्हणजे ?"

"काल फोटो टांगण्यासाठी भिंतीत खिळा ठोकत होतो. खिळा काही भिंतीत जायला तयारच नव्हता. शेवटी मी बाबांना विचारलं की काय करू म्हणून, तर ते म्हणाले, 'जरा डोक्याचा वापर कर...'' दादू म्हणाला.

❖

## १२३. व्यवस्थित

एकदा एक माणूस थोडेसे पैसे घेऊन तांदूळ आणण्यासाठी बाजारात गेला. काही वेळाने तो घरी परत आला व बायकोला म्हणाला, "आज बाजारात इतकी गर्दी होती की कोणाची तरी पिशवी हरवली."

"तुमची पिशवी नीट आहे ना ?"

"बहुतेक माझीच हरवली." त्याने म्हटले.

हे ऐकून बायको संतापली व म्हणाली, "पैसे तरी जागेवर आहेत का ?"

"हो ऽऽ पैशांची पुरचुंडी मी पिशवीच्या बंदांना व्यवस्थित बांधून ठेवली आहे." तो शांतपणे उतरला.

❖

## १२४. तरीच

आरोग्यविषयक सदर वाचताना अमित ताईला उद्देशून म्हणाला, "ताई, हे बघ इथं काय लिहिलंय. रोग नेहमी माणसाच्या शरीराच्या दुबळ्या भागावर हल्ला करतात म्हणे."

"तरीच ! तुला वारंवार डोकेदुखीचा त्रास होत असावा." ताई म्हणाली.

❖

## १२५. निरुपाय

"काय रे, मी तुला सांगितलं होतं की हा खाऊ पोपटाला खाऊ घाल अन् तू तर खुशाल मांजराला खाऊ घातलंस ? मूर्ख कुठला," शांताबाई नोकरावर रागवत म्हणाल्या.

"काय करणार बाईसाहेब ? माझ्यापुढं दुसरा मार्गच नव्हता. कारण

मी तिथे गेलो त्याच्या थोड्याच वेळापूर्वी मांजरानं पोपट खाऊन टाकला होता,'' नोकर म्हणाला.

### १२६. द ग्रेट कॅच!

आनंदनगरच्या टीमला भाग्यनगरवाल्यांनी आव्हान दिलं. आनंदनगरमधील बरेच चांगले खेळाडू सुट्टीत गावी गेल्याने या टीममध्ये बजरंगची वर्णी लागली.

प्रतिपक्षाची फलंदाजी सुरू झाली. फलंदाजाने एक उंच फटका मारला. चेंडू सरळ बजरंगकडे झेपावला. तो सज्ज होताच, त्याने झेल पकडला. त्याच्या जीवनातला पहिलाच झेल! त्याने आनंदाने उड्या मारल्या, चेंडू उंच फेकून झेलला, चेंडूला छातीशी कवटाळले. स्वत:वर भलताच खूश होऊन चेंडू या हातातून त्या हातात खेळवू लागला.... तेवढ्यात एक क्षेत्ररक्षक ओरडला,

''गाढवा, फेक तो चेंडू लवकर, त्यांनी पाच धावा काढल्यात.''

बजरंगनं 'नोबॉल' वर झेल पकडला होता!

### १२७. अडचण

इक्बाल डॉक्टरसाहेबांना सांगत होता - ''डॉक्टर अंकल, जेव्हा मी खाली वाकून उजवा आणि नंतर डावा पाय उचलतो तेव्हा मला चक्कर येते.''

''या प्रकारचा व्यायाम घेणं तू ताबडतोब बंद कर पाहू.'' डॉक्टर म्हणाले.

''व्यायाम! पण ... मी असा वाकलो नाही तर पँट चढवायची तरी कशी मग?'' इक्बालनं अडचण सांगितली.

### १२८. दयावान

एक इसम संपतरावांकडे येऊन म्हणाला, ''त्या पलीकडच्या गल्लीत राहणारी बाई फारच गरीब आहे बिचारी. ती घरभाडंसुद्धा देऊ शकत नाही. तिच्यासाठी मी पैसे गोळा करतोय्. तुम्ही काही मदत करू

शकाल काय ?"

"हो, अवश्य. हे घ्या दहा रुपये. तुम्ही फार दयाळू दिसताय्. तुम्ही कोण ?"

"मी तिचा घरमालक आहे." पैसे खिशात ठेवत तो इसम म्हणाला!

❖

## १२९. अरे देवा

शशांक आपल्या हातातली वस्तू उत्साहाने दाखवीत आईला म्हणाला, "आई, ही बघ मी सतार बनवलीय्."

"अरे वा! फारच छान. पण ह्या तारा कुठून आणल्यास तू ?"

"तुझ्या सतारीच्या तोडून घेतल्या." शशांक म्हणाला.

❖

## १३०. कुणास ठाऊक ?

एके दिवशी इसाप रस्त्याने चालला असताना वाटेत कोतवालाशी गाठ पडली. त्याने विचारले, "काय इसाप, कुठे चालला आहेस ?"

"माहीत नाही, हुजूर." इसाप नम्रपणे म्हणाला.

त्याच्या अशा बोलण्याचा राग येऊन कोतवाल रागावून म्हणाला, "माझा अपमान करतोस ? तुला तुरुंगात डांबतो म्हणजे कळेल!"

"पाहिलंत हुजूर, आता मी तुरुंगात जाईन हे ठाऊक तरी होतं का मला ?" इसाप म्हणाला.

❖

## १३१. दयाळू

भर पावसात कशीबशी छत्री सावरत येऊन पोस्टमनने प्रोफेसर भट्टाचार्यना पत्र दिलं. त्याची दया येऊन प्रोफेसर महोदय म्हणाले, "एवढ्या पावसात कशाला आलात ? पोस्टानं पत्र पाठवलं असतं तरी चाललं असतं."

❖

## १३२. नियमपालन!

एक अरुंद नदी वाहत होती. आणि तिच्यावर एक कच्चा पूल

बांधलेला होता. पुलाच्या बाजूला एक नोटिस बोर्ड अडकवलेला होता. त्यावर लिहिलं होतं-

'ह्या पुलावरून जाणाऱ्यांनी चार किलोपेक्षा जास्त वजन बरोबर नेऊ नये.'

*एकदा 'विलं गोळा' करणारा एक माणूस नाण्यांनी भरलेली सहा किलो वजनाची थैली घेऊन जात होता. पुलाजवळ आल्यावर त्याने* नोटिस बोर्ड वाचला आणि तो गोंधळात पडला. थोडा वेळ विचार केल्यावर त्याला युक्ती सुचली. त्याने नाण्याचे तीन भाग केले.

वेगवेगळ्या तीन थैल्यांत ते भरले आणि पुलावरून जाता जाता एकेक थैली वर हवेत फेकत राहिला. 'एक, दोन, तीन... एक, दोन, तीन' एखादा लहान मुलगा गोळ्या झेलीत चालावा त्याप्रमाणे चालत त्याने पूल ओलांडला.

❖

## १३३. सूट

एका शहरात एक शानदार बाग बनविण्यात आली. बागेची शोभा टिकून राहावी म्हणून जागोजागी वेगवेगळ्या सूचना देणारे फलक लावण्यात आले होते.

एका फलकावरचा मजकूर होता-

'हिरवळीवरून चालणाऱ्याला वीस रुपये दंड करण्यात येईल.'

त्याखाली कुणीतरी मजकूर वाढवून लिहिला, 'ग्रुपमध्ये येणाऱ्याला सूट मिळेल.'

❖

## १३४. अरेरे!

दिवाळीची खेळण्यातली पिस्तुलं घेऊन बंडू व त्याचे मित्र लढाईचा खेळ खेळत होते. घनघोर लढाई चालू होती. खेळण्यात खूपच मजा येत होती. शेवटी बऱ्याचशा गोळ्या खाऊन बंड्या ठार झाला. जमिनीवर तो उताणा पडून राहिला.

काही वेळानं बंडूची मावशी तिथं आली अन् तिने बंडूला हाक दिली, "अरे बंडू, इकडे ये बघू."

"मी मेलोय् ग मावशी. मी येऊ शकणार नाही," बंड्या पडल्यापडल्या ओरडला.

"अस्सं? बिचारा! मी तर तुझी आवडती काजू बर्फी आणली होती. पण आता काय उपयोग? तू तर स्वर्गातील बर्फी खायला निघालास." मावशी तिथून निघून जात म्हणाली!

❖

## १३५. वा!

माधवीला सरांनी विचारलं, "असं कोणतं काम आहे जे तुझ्याशिवाय कुणीच करू शकत नाही."

"मी माझं हस्ताक्षर वाचू शकते." माधवी पटकन म्हणाली.

❖

## १३६. कारण

आपल्या मित्राशी बोलताना जॉन म्हणाला, "पाणबुडीवर काम करण्याची इच्छा दर्शविणारा माझ्या दादाचा अर्ज नौदलानं नामंजूर केला."

"का बुवा? तुझ्या दादानं नीट तयारी केली नव्हती काय? तो कसोटीवर उतरला नाही की काय?" मित्राने विचारले,

"नाही रे, हे कारण नाहीच."

"मग?"

"माझ्या दादाला रात्री खिडक्या उघड्या टाकून झोपायची सवय आहे हे बहुतेक त्यांना कळलं असावं." जॉन कुजबुजत्या स्वरात म्हणाला.

❖

## १३७. म्हणूनच तर

मासिकातल्या सगळ्या गोष्टी वगैरे वाचून झाल्यावर वैभवने शब्दकोडे सोडवायला घेतले. जवळपास सगळे शब्द भरून झाले. तीन शब्द बाकी राहिले. बराच प्रयत्न करूनही शेवटी त्याला ते शब्द काही भरता आले नाहीत. शेवटी त्याने या बाबतीत रमेशची मदत घ्यायची असं ठरवलं. रमेशला जेव्हा त्याने ते शब्दकोडे दाखवले तेव्हा काही क्षण विचार करून रमेश म्हणाला, "हं! यात काय अवघड? एखादा मूर्ख देखील सहज सांगू शकेल हे शब्द."

"म्हणूनच तर तुझ्याकडे आलोय." वैभव सहजपणे म्हणाला.

❖

## १३८. फारच छान

कोणतेही काम करताना हाताच्या अंगठ्याचा कसा उपयोग होतो हे सांगून झाल्यावर बाबांनी विचारलं, "समज, तुझे दोन्ही अंगठे तुटले तर काय होईल ?"

"मला शाळेत जावं लागणार नाही." महेन्द्र उत्साहाने म्हणाला!

❖

## १३९. विक्री कला

आपल्या मुलाला दुकानात बसवून दुकानदार आतल्या भागात गेला. थोड्या वेळाने आत येऊन मुलाने विचारलं, "बाबा, गिऱ्हाईक विचारतंय् की स्वेटर धुतल्यानंतर आकसेल का ?"

"स्वेटर त्याला फिट बसतो का ?" दुकानदाराने विचारले.

"नाही. थोडा ढिला होतोय्."

"मग सांग त्याला, धुतल्यानंतर थोडा आकसेल म्हणून." दुकानदार म्हणाला.

❖

## १४०. आळशी

एका कार्यालयातील एक कारकून लंचटाईममध्ये आपल्या मित्राला सांगत होता, "आजकाल लोक भलतेच आळशी झालेत बुवा!"

"कशावरनं म्हणतोयस तू हे ?" मित्राने विचारले.

"अरे, माझ्या टेबलाजवळच्या खिडकीतून तब्बल दीड तास अगदी टक लावून मी पाहत होतो. रस्त्यावर नळ उकरून एक मजूर काहीही न करता नुसता स्वस्थ बसून होता."

❖

## १४१. चालतील

दादूने पिकनिकसाठी म्हणून बाबांकडे वीस रुपये मागितले, पण बाबांनी चक्क नकार दिला. त्याच्या विनवणीचा काहीच उपयोग झाला नाही. हिरमुसला होऊन तो झोपी गेला. रात्री त्याला स्वप्न पडलं ..

बाबा त्याला एक-एक रुपया देत होते. एकोणीस रुपये झाले तेव्हा बाबा थांबले.

"मला वीस हवेत." दादू जोरात ओरडला अन् स्वतःच्या आवाजाने त्याला जाग आली.

डोळे उघडून पाहतो तर हातात काहीच नाही! त्याने पुन्हा डोळे मिटले व म्हणाला, "बरं, एकोणीस तर एकोणीस द्या. चालतील."

## १४२. संधी द्या

नूतन विद्यालयाचा विद्यार्थी हनुमंत हा चांगला कुस्तीगीर होता. आंतरशालेय क्रीडास्पर्धा जवळ आल्या तेव्हा मात्र त्याच्या शाळेतल्या शारीरिक शिक्षकांना काळजी वाटू लागली. नियमाप्रमाणे शाळेच्या प्रथम सत्र परीक्षेत तो पास व्हायला हवा होता. नापास झालेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेता येत नसे. खूप विचार करून शेवटी त्यांनी गणिताच्या शिक्षकांची भेट घेऊन त्यांना विनंती केली, "काहीही करा, पण याला गणितात नापास करू नका."

"ठीक आहे. बोलावा त्याला, मी त्याला अगदी सोपा असा एकच प्रश्न विचारतो आणि पास करतो."

गणिताच्या शिक्षकांनी हनुमंतला विचारले, "पाचमधून दोन गेले तर किती उरतील?"

"तीन." हनुमंत पटकन म्हणाला.

"थांबा... थांबा... एवढी घाई करू नका, त्याला आणखी एक संधी द्या प्लीज." शारीरिक शिक्षक अजिजीच्या स्वरात म्हणाले.

## १४३. न... नाही

भर वेगात आलेली एक जीप खर्रकन थांबली. त्यातून उतरलेल्या एका मोठ्या सेनाधिकाऱ्याने तिथे खेळत असलेल्या मुलाला विचारले, "बाळ, एखादं विमान कोसळताना पाहिलंस का तू?"

"न... नाही. मी तर माझ्या गलोलीनं समोर बसलेल्या चिमणीला खडा मारला होता." मुलगा घाबरून म्हणाला.

## १४४. रंगीत तालीम

बंडूच्या कंपूने सुट्टीत एक सहल आयोजित केली. वडीलधारी मंडळी याला परवानगी देणार नाही म्हणून गुप्तपणे ही सहल आयोजित करण्यात आली. बंड्याने दिवाळीच्या फराळाचे बरेचसे जिन्नस पळवून सहलीचा आनंद वाढविण्याचा प्रयत्न केला. सगळा दिवस आनंदात घालवून सगळे अंधार पडू लागल्यावर परतले.

बंड्या अगदी सावधपणे जिना चढत होता. तो गॅलरीत पोहचला न पोहचला तोच धाडकन दार उघडले अन् बाहेर आलेल्या स्त्रीने 'आता येतो आहेस वाटतं' असं म्हणून बंडूला बुकलायला सुरुवात केली. काही वेळानं बंड्यानं कशीबशी सुटका करून घेतली.

त्या स्त्रीने जेव्हा बंड्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं तेव्हा ती चांगलीच दचकली. दिलगिरी व्यक्त करीत ती म्हणाली, "अरे बंड्या, तू होय? मला वाटलं आमचा श्याम्याच आहे बघ ... अरेरे! उगीच मारलं बघ मी तुला -"

"जाऊ द्या आँटी," बंडू म्हणाला, "वाईट एवढ्यासाठीच वाटतंय् की, मला या सर्व प्रकारातून पुन्हा एकदा जावं लागणार आहे."

❖

## १४५. बहुतेक

आनंदरावांची दाढी करताना अचानक नापिताने प्रश्न केला, "साहेब, सकाळी नाश्त्यात तुम्ही टोमॅटो सॉस खाल्ला होता काय?"

"नाही, का बरं?"

"मग मी बहुतेक तुमचा गळाच कापला असावा." नापित वस्तऱ्याकडे पाहत म्हणाला.

❖

## १४६. नक्कीच

शिक्षक : 'आता मी सुखाने प्राण सोडतो' असे उद्गार बाजीप्रभूने कोणत्या लढाईत काढले?

दादू : मला वाटतं शेवटच्या लढाईत काढले असावेत.

❖

## १४७. फक्त...!

एक माणूस एकदा आपल्याजवळ असलेल्या संपत्तीची खूप तारीफ करीत होता. तो म्हणाला, "माझ्या घरात सर्व काही आहे." नंतर हाताची दोन बोटे दाखवीत म्हणाला, " फक्त दोन गोष्टी नाहीत. एक सूर्य आणि दुसरा चंद्र."

तेवढ्यात घरातला नोकर तेथे आला आणि त्याला म्हणाला - "बाबूजी, आज स्वयंपाकघरात लाकडे नाहीत."

त्या श्रीमंत माणसाने तिसरे बोट दाखवले आणि म्हणाला, "सूर्य नाही. चंद्र नाही आणि जळाऊ लाकडे नाहीत!"

❖

## १४८. फरक

भौतिकशास्त्राचा तास चालू होता. फुलेसरांनी विजेबद्दल माहिती दिली. सारी माहिती देऊन झाल्यावर त्यांनी विचारलं, "आकाशातील वीज आणि घरात वापरली जाणारी वीज यात कोणता फरक आहे?"

"घरात वापरल्या जाणाऱ्या विजेचं बिल भरावं लागतं अन् आकाशातील विजेसाठी पैसा द्यावा लागत नाही." रफिक उत्साहाने म्हणाला.

❖

## १४९. अरेरे ...!

एकदा एक माणूस चालता चालता पडला. लागलीच तो उठून उभा राहिला पण पुन्हा पडला. मनाशी तो म्हणाला - 'च... च... मी पुन्हा पडणार आहे हे आधीच माहीत असतं तर मी उठलोच नसतो.'

❖

## १५०. मेजवानी

वाळवी आपल्या कुटुंबियांना आनंदाने सांगत होती...

"आज रात्री आपल्याला झक्कपैकी मेजवानी मिळेल. घरमालकानं नुकतेच म्हैसूरहून दुर्मिळ असं जुनं फर्निचर मागवलं आहे."

❖

## १७१. मूर्ख कुठचा!

एका माणसाला 'काय मूर्ख आहे!' असं सारखं म्हणायची सवय होती. दुसरा एक माणूस त्याला म्हणाला, "परवा एक माणूस पाहिला, त्याला तुमच्याप्रमाणेच 'काय मूर्ख आहे?' असं म्हणायची सवय होती. त्याबद्दल त्याला पकडून नेऊन शिक्षा करण्यात आली. तेव्हा तुम्ही जरा सावधान राहा."

"काय मूर्ख आहे!" तो उत्तरला.

❖

क्र. ३००६ दिनांक १०/११/
BVBK-0403006